दि. 18/02/2023

1) पुढारी पान क्र. 5

# गावठी पिस्तूल, काडतुसांसह चाकू बाळगणारे अटकेत

नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा

बेकायदेशिररित्या शस्त्र बाळगणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. सदर कारवाई हवालदार सचिन दोरकर यांना मिळालेल्या माहितीनुसार वालीव पोलिसांनी केली. या कारवाईत गावठी पिस्तूल, ७ काडतूस, धारदार चाकू, मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.



शहरात कायदा व सुवस्था टिकवून ठेवण्यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सर्व पोलीस ठाण्यांना, गुन्हे शाखेच्या पथकांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार प्रत्येक पोलीस ठाण्याची पथके आपापल्या परीने विशेष मोहीम राबवत होते. या मोहिमेंतर्गत शोधमोहीम सुरू असताना वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे हवालदार सचिन दोरकर यांना शस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती खबऱ्याने दिली. सदर माहितीच्या आधारे वसई फाटा ते रेंज नाका रोडवर गोलानी नाका दरम्यान सापळा लावून

वालीव पोलिसांनी धर्मेंद्र यादव (३४) व हिरानाथ उर्फ मामा यादव (४८) यांना ताब्यात घेतले. या दोघांची अंगझडती घेतली. तसेच दुचाकीच्या डिकीत एक गावठी बनावटीचे पिस्तूल, सात जिवंत काडतुसे व एक धारदार चाकू असा एकूण ९१ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल आढळला. याप्रकरणी वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

2) लोकमत पान क्र. 1

# तुनीषा शर्माच्या आत्महत्येला शिजान खान जबाबदार

## न्यायालयात ५२४ पानांचे दोषारोपपत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : टीव्ही अभिनेत्री तुनीषा शर्मा हिच्या आत्महत्या प्रकरणात वालीव पोलिसांनी आरोपी शिजान खानविरुद्ध गुरुवारी वसई न्यायालयात ५२४ पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. यात अभिनेता शिजान खान भेटून आल्यानंतर तुनीषाने आत्महत्या केल्याचे नमूद केले असून, आत्महत्येप्रकरणी त्याला दोषी ठरवल्याचेही सूत्रांकडून कळते.

शिजान खान सध्या ठाणे तुरुंगात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिजानच्या जामिनाबाबत मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. यापूर्वी वसई न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्याचबरोबर या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ फेब्रुवारीला होणार आहे.

### तिला मला काहीतरी सांगायचे होते!

तुनीषा शर्माच्या आत्महत्येनंतर तब्बल दोन महिन्यांनी टीव्ही अभिनेता चंदनने धक्कादायक खुलासा केला आहे. तुनीषा डिप्रेशनमध्ये नव्हती, असे तो म्हणतो. आत्महत्येच्या एक दिवस आधी तिला मला काहीतरी सांगायचे होते पण, तो तिला वेळ देऊ शकला नाही, असे चंदन याने सांगितले.

3) पुढारी पु. पान क्र. 1

# मृतदेह सापडला

नालासोपारा : विरार पूर्वेकडील पापडखिंड तलाव परिसर भागातील डोंगराळ क्षेत्रात एका २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह सापडला. आदर्श पांडे ऊर्फ विकी असे या तरुणाचे नाव आहे. तो आपल्या कुटुंबीयांसोबत विरारचा फुलपाडा येथे राहत होता. २ जानेवारीपासून बेपत्ता होता. परंतु त्याच्या घरच्यांनी २९ जानेवारी रोजी विरार पोलीस ठाण्यात मिसिंग झाल्याची नोंद केली. त्याचा मृतदेह पापडखिंडमध्ये सापडला असून पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेस्थळी पोलिसांना मृत आदर्शसोबत त्याचे मोबाईल फोन मिळाले आहेत. ही हत्या की आत्महत्या याचा तपास विरार पोलीस करत आहेत.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 18/02/2023

4) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी मनसेचे उपोषण



। मीरा रोड : मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी गुरुवारपासून मनसेने साखळी उपोषण सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्यात येणार असल्याचे मनसेकडून सांगण्यात आले आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता ठेवण्यासाठी महापालिकेने ठेकेदाराची नेमणूक केली होती. या ठेकेदाराने सफाई कर्मचाऱ्यांचे दोन वर्षांचे पगार व बोनस दिलेला नाही. ठेकेदाराने महापालिका व सर्व सफाई कर्मचाऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप मनसेने केला आहे. या ठेकेदाराने अधिकाऱ्यांच्या संगनमताने जवळपास ३ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप मनसेने केला आहे. कामगारांचा थकित पगार व बोनस त्यांच्या खात्यात जमा करावा तसेच संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागण्यांसाठी भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात मनसेने उपोषण सुरू केले आहे. मनसेचे शहर अध्यक्ष हेमंत सावंत, मीरा-भाईंदर महापालिका कामगार कर्मचारी सेनेचे अध्यक्ष हरेश सुतार, महिला शहर अध्यक्षा कविता वायंगणकर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी तसेच सफाई कर्मचारी सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या हक्काचे पैसे त्यांना मिळालेच पाहिजे, अधिकारी यांनी या भ्रष्टाचाराची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, या मागण्या जोपर्यंत मान्य होत नाहीत तोपर्यंत हे साखळी उपोषण सुरू राहील, असे सुतार यांनी सांगितले.

5) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# पेणकरपाडा येथील कंपनीला आग



। मीरा रोड : काशिमीरा येथील पेणकरपाडा परिसरातील आधारशीला प्रिमायसेस सोसायटीमधील चौथ्या मजल्यावर असलेल्या कंपनीला आग लागल्याने कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

पेणकरपाडा परिसरातील आधारशीला प्रिमायसेस सोसायटीमध्ये चार मजल्यांची इमारत असून, एकूण ६४ गाळे आहेत. यातील चौथ्या मजल्यावर असलेल्या ४०७ या गाळ्यांमध्ये लोखंडाचे वेगवेगळे वस्तू बनवण्याचा कारखाना आहे. या कारखान्यात शुक्रवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास आग लागली. आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन दल त्वरित घटनास्थळी दाखल होऊन ही आग दोन तासांत विझवण्यात आली. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळला. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नसून कंपनीचे सर्व साहित्य जळून खाक झाले. ही आग वेल्डिंग करताना लागल्याचे अग्निशमन विभागप्रमुख प्रकाश बोराडे यांनी सांगितले.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 18/02/2023

6) लोकमत पान क्र. 1

# शिंदेसेनाच शिवसेना!

## निवडणूक आयोगाचा निर्णय; धनुष्यबाणही शिंदेना, उद्धव ठाकरेंना धक्का

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पक्षाचे नाव आणि चिन्ह यासाठी गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाचा शेवट केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाने शुक्रवारी झाला. शिवसेना हे पक्षाचे नाव व धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचा ताबा राहणार आहे. उद्धव ठाकरे यांचे शिवसेना पक्षप्रमुख पद लोकशाही तत्त्वाचे पालन करून तयार केलेले नव्हते, असे नमूद करून आयोगाने ठाकरे यांना जबरदस्त धक्का दिला.

यापूर्वी शिंदे यांच्या नेतृत्वातील 'बाळासाहेबांची शिवसेना' हा पक्ष व त्यांचे ढाल-तलवार हे निवडणूक चिन्ह आयोगाने गोठविले आहे. त्याचबरोबर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हा पक्ष व त्यांचे मशाल हे निवडणूक चिन्ह यांची मुदत केवळ चिंचवड पोटनिवडणुकीपर्यंत असल्याचेही आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाने घटनेच्या ३२४ कलमांन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करत पक्षाचे नाव आणि चिन्ह यांचे वाटप केल्याचे म्हटले आहे.

### कोणाची खासगी मालमत्ता नाही

आम्ही पहिल्या दिवसापासून खरी शिवसेना हीच आहे, हे सांगत होतो. ही विचारांची शिवसेना आहे, तो विचार पुढे नेण्याचे काम शिंदे करतायत. खासगी मालमत्ता म्हणून शिवसेनेवर कुणी अधिकार सांगू शकत नाही.

- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

### अखेर हा सत्याचा विजय

हा लोकशाहीचा विजय आहे, हा बहुमताचा विजय आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या विचारांचा विजय आहे. माझ्यासोबत असलेले सर्व आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी, ज्यांनी माझ्या भूमिकेला पाठिंबा दिला, त्या सगळ्यांचा विजय आहे. अखेर हा सत्याचा विजय आहे.

- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

**एका व्यक्तीचा अधिकार :** शिवसेनेच्या घटनेनुसार संघटनात्मक नियुक्त्यांचे सारे अधिकार एका व्यक्तीला आहेत. हे लोकशाही तत्त्वांच्या विरोधात आहे. शिवसेनेची सर्वोच्च निर्णय संस्था राष्ट्रीय कार्यकारिणी आहे. प्रतिनिधी सभेचे सदस्य राष्ट्रीय कार्यकारिणी निवडतात. प्रतिनिधी सभेच्या सदस्यांबाबत तपशील दिलेला नाही.

### मिळालेल्या मतांचाही विचार

आयोगाने निवडून आलेले लोकप्रतिनिधी व त्यांना मिळालेल्या मतांना सुद्धा हा निर्णय घेताना गृहित धरले. बहुमत चाचणीमध्ये शिंदे गटाचे वर्चस्व हे स्पष्ट असल्याचे नमूद केले आहे. शिंदे गटाकडे ४० आमदार आहेत. त्यांना ३६ लाख ५७ हजार मते मिळाली आहेत. शिवसेनेला मिळालेल्या एकूण मतांपैकी हे ७६ टक्के मते आहेत. याउलट ठाकरे गटाच्या १५ आमदारांना ११ लाख २५ हजार मते मिळाली आहेत. त्याचप्रमाणे १३ खासदार शिंदे गटाकडे आहेत. त्यांना ७४ लाख ८८ हजार मते मिळाली आहेत. ही टक्केवारी शिवसेनेच्या एकूण मतांपैकी ७३ टक्के एवढी आहे तर ठाकरे गटाकडे ५ खासदार आहेत. त्यांना २७ लाख ५६ हजार मते मिळाली आहेत.




**७८ पानांच्या** निकालात निवडणूक आयोगाने जवळपास सर्व बाजूंनी आढावा घेतला आहे.

पक्षाच्या संघटनात्मक बाजूंवर कुणाचे वर्चस्व आहे, हे तपासणे कठीण आहे. हे निश्चित निर्णय घेण्याइतपत स्पष्ट नसल्याचे आयोगाने सांगितले.

**राज्यघटनेच्या ३२४ नुसार मिळालेल्या अधिकारानुसार व निवडणूक चिन्ह वाटप कायदा १९६८ च्या कलम १५ व १८ नुसार पक्षाचे नाव व धनुष्यबाण चिन्ह हे अर्जदार एकनाथ शिंदे यांना देत असल्याचे आयोगाने स्पष्ट केले.**


CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 18/02/2023

७) लोकसत्ता पान क्र. 15

## दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण

लोकसत्ता वार्ताहर

**वसईः** नालासोपारा पूर्वेच्या आचोळे डोंगरी परिसरातून सुरक्षारक्षकाकडून दीड वर्षाच्या मुलीचे अपहरण झाल्याचा प्रकार घडला आहे. बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी आरोपी विरोधात आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

चिमुकलीला बुधवारी संध्याकाळी फिरवून आणण्याच्या बहाण्याने राजेंद्र कुमार या ओळखीच्या सुरक्षा रक्षकाने उचलून नेले. सानवी बिदलानी असे अपहरण झालेल्या मुलीचे नाव आहे. हा व्यक्ती मधुबन परिसरात नोकरी करतो. मुलीला उचलून नेत असल्याचे चित्रण कॅमेऱ्यात कैद झाले आहे.

याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करून या मुलीचा शोध सुरू केला आहे याशिवाय ह्या व्यक्तीचे व अपहरण झालेल्या मुलीचे छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित केले आहे. ज्यांना कोणाला ही व्यक्ती अथवा मुलगी आढळून आल्यास तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

८) पुण्यनगरी पु. पान क्र. 2

## अवैध मांस विक्रीप्रकरणी दोघांना अटक

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत वरसावे येथे अवैधरित्या वाहनातून विक्रीसाठी मांस घेऊन जाणाऱ्या टेम्पोसह दोघांना अटक केली आहे. त्यांच्या विरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील वर्सोवा पुलाजवळ नाकाबंदीदरम्यान पोलिसांनी एक महिंद्रा पिकअप वाहन तपासणीसाठी थांबवले होते. वर्सोवा पुलाजवळ काशिमीरा पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक जगन्नाथ पडेलकर आणि हवालदार हौसराव आंधळे हे सुरक्षेसाठी तैनात होते. त्या वाहनाची तपासणी केली असता, त्या टेम्पोत प्राण्याचे काही तुकडे आढळून आले. त्या वाहनाला ताब्यात घेऊन वजन काट्यावर वजन केले असता, हे मांस अंदाजे १६५० किलो होते. त्याची किंमत १३० रुपये प्रतिकिलो या दराने २ लाख १५ हजार रुपये आहे. तर जप्त केलेल्या महिंद्रा पिकअप या वाहनाची किंमत ५ लाख असल्याचे सांगण्यात आले आहे. काशिमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून चालक वाजिद अली शुरकुल्ला व त्याचा सहकारी क्लिनर अहमदराजा मोहम्मद यासीन सिद्दीकी या दोघांना अटक केली आहे. मीरारोडमधील नयानगर येथून मांस मागवणाऱ्या व्यक्तीचा पोलीस शोध घेत आहेत. मांस कुठून आणले आणि कोणाला विकायचे याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

समय भास्कर

# देसी बंदूक और सात जिंदा कारतूस के साथ दो गिरफ्तार

पंकज दुबे/ मीरा-भाईंदर

मीरा भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले वालीव पुलिस स्टेशन के क्राइम ब्रांच यूनिट ने एक देसी बंदूक और 7 जिंदा कारतूस के साथ दो लोगों को गिरफ्तार कर लिया है। पुलिस को गुप्त सूचना मिली थी कि कुछ लोग हथियारों की खरीदी -बिक्री करने के लिए आने वाले है, जिस पर पुलिस ने संज्ञान लेते हुए जाल बिछाया और इस मामले में 2 लोगों को गोलाणी नाका वसई पूर्व से गिरफ्तार कर लिया, पुलिस ने आरोपियों के पास से अवैध देसी बंदूक, धारदार हथियार, । जिंदा कारतूस, और एक एक्टिवा सहित लाखों का सामान भी आरोपियों के पास से बरामद किया है यह कार्य परिमंडल 3 के पुलिस उपायुक्त सुहास बावचे तथा परिमंडल 2 के अतिरिक्त कार्यभार चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच के पुलिस निरीक्षक कैलाश बर्वे, मिलिंद साबले, और उनकी टीम ने किया हथियार की खरीदी बिक्री करने की मंशा सामने नहीं आ पायी है, पुलिस ने आरोपियों पर धारा 3, 4, 25, और महाराष्ट्र पुलिस अधिनियम 1951, कि धारा 37(1), (3), 115 के तहत मालमा दर्ज कर आगे कि कार्रवाई कर रही है।

Scanned with CamScanner

लोकमत

# रस्ते गुळगुळीत म्हणून वाहन पळवाल, तर दंड!

## अनेक वाहनचालक करतात वेगमर्यादेचे उल्लंघन

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : मुंबई-अहमदाबाद या मुंबई आणि गुजरात राज्यांना जोडण्याच्या प्रमुख महामार्गावर वेगमर्यादेचे नियम डावलून वाहने धावत आहेत. त्यामुळे अनेकदा वाहनांवरील ताबा सुटून अपघात झाल्याच्या घटनादेखील वाढल्या आहेत.

महामार्गावरून रोज मुंबई ते गुजरात आणि गुजरात ते मुंबई अशी हजारो वाहने या मार्गावरून धावतात. दरम्यान, वाहनांच्या वेगावर निर्बंध असावेत यासाठी महामार्ग पोलिसांकडून स्पीडगन व्हॅनच्या माध्यमातून कारवाई केली जाते. यामध्ये जर महामार्गावरील वाहन हे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने असेल तर स्पीडगनद्वारे त्या वाहनांचा नंबर व गती नोंद केली जाते, तसेच संबंधित वाहनधारकावर ऑनलाइन दंडात्मक कारवाई केली जाते. यामुळे महामार्गावर स्पीडगन दिसताच अनेक वाहनांची वेगमर्यादा कमी होते. दरम्यान, दंडाची रक्कम १५ दिवसांत भरण्यासंदर्भात संबंधिताला संदेश पाठवला जातो.



### वेगमर्यादेचे उल्लंघन केले म्हणून किती दंड ?

| | |
|---|---|
| दुचाकी-तीनचाकी | १,००० रु. |
| ट्रॅक्टर | १,५०० रु. |
| चारचाकी | २,००० रु. |

### राज्य-राष्ट्रीय महामार्गावर वाहने सुसाट

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून राज्यासह दुसऱ्या राज्याच्या गाड्या, मालवाहतूक ट्रक, कंटेनर भरधाव वेगाने ये-जा करतात. या महामार्गावर वाहतूक कोंडीची समस्या होत असल्याने गर्दीच्या काही ठिकाणी उड्डाण पूल बांधले आहेत. वाहतूक पोलिसांनुसार महामार्गावर होणाऱ्या बहुतेक दुर्घटना माणसांच्या चुकीमुळे होतात. गाडी ओव्हर टेक करणे, जास्त काळ ड्रायव्हिंग करणे, गाडी चालवताना डुलकी लागणे, वेगाने-नशेत गाडी चालविणे अशी कारणे आहेत.

### दीड महिन्यात ४१ लाखांचा दंड

वाहन हे मर्यादेपेक्षा जास्त वेगाने चालवणाऱ्यांवर महामार्ग पोलिसांकडून दररोज कारवाई केली जात आहे. १ जानेवारी ते १६ फेब्रुवारीदरम्यान भरधाव व अतिवेगाने वाहने चालविणाऱ्या २ हजार ५६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून ४१ लाख १७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

### एक किलोमीटरवरून वाहनांचा मोजला जातो वेग

महामार्गावर अतिवेगात असलेल्या वाहनांचा वेग एक किलोमीटर अंतरापर्यंत मोजला जातो. वेगमर्यादा ओलांडली असेल तर 'स्पीडगन'द्वारे त्या वाहनांचा व्हिडीओ आणि फोटो संपादित केले जातात. त्यानंतर ऑनलाइन चालान होते आणि आरसी नंबरवरून संबंधितांना दंड आकारला जातो.

### ओव्हरस्पीड वाहने चालवणाऱ्यांना लावला जातो दंड

वरिष्ठांच्या आदेशानुसार आणि मार्गदर्शनाखाली महामार्गावरील भरधाव वेगातील वाहनांवर स्पीडगनच्या मदतीने वाहनांचा वेग रोखला जातो. जी वाहने ओव्हर स्पीड चालवतात त्यांना दंड ठोठावण्यात येतो.

- विठ्ठल चिंतामण, पोलिस उपनिरीक्षक, महामार्ग पोलिस केंद्र, चिंचोटी



Scanned with CamScanner

लोकमत

# महाशिवरात्रीसाठी तुंगारेश्वर मंदिर सज्ज

## पोलिस, पालिका, मंदिर प्रशासनाची जय्यत तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शनिवारी असणाऱ्या महाशिवरात्रीनिमित्ताने पालघर जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले तुंगारेश्वर मंदिर सज्ज झाले आहे. यासाठी पोलिस, महानगरपालिका, मंदिर आणि प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. यावेळी होऊ घातलेल्या कार्यक्रमात आणि दर्शनात कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

वसई पूर्वेकडील तुंगारेश्वर डोंगरावर असलेल्या तुंगारेश्वर मंदिरात भव्य महाशिवरात्री उत्सव साजरा होणार असल्याने दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येतात. यावेळी श्री तुंगारेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास विविध मान्यवरांच्या हस्ते अभिषेक करून महाशिवरात्री उत्सवास सुरुवात होणार आहे. तुंगारेश्वर डोंगरावर महादेवाचे पुरातन मंदिर आहे. महाशिवरात्र व श्रावण महिन्यात वसई तालुक्यासह ठाणे, पालघर जिल्ह्यांतून येथे लाखो भक्त येतात. तुंगारेश्वराचे दर्शन घेतानाच येथील निसर्गाचाही आनंद भाविक घेतात.



तुंगारेश्वर मंदिरात मोठा बंदोबस्त लावण्यात येणार आहे. भाविकांच्या सुरक्षेचीही काळजी घेणार आहोत. एकाच ठिकाणी जास्त गर्दी होणार नाही, याचीही दक्षता घेतली जाणार आहे.

- कैलास बर्वे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वालीव पोलिस ठाणे

महाशिवरात्रीसाठी मंदिर प्रशासन झाले आहे. भाविकांनी दर्शनाला येताना जंगलात आग लागणार नाही, प्लास्टिकचा वापर टाळून जंगल स्वच्छ कसे राहील व कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी दक्षता घ्यावी.

- रमेश घोरकाना, अध्यक्ष, श्री तुंगारेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ



Scanned with CamScanner

# अमली पदार्थ पिणाऱ्या दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पेल्हार पोलिसांनी गुरुवारी रात्री कातकरी पाडा आणि धानीव बाग परिसरात अंमली पदार्थ पिणाऱ्या दोन आरोपींना पकडले आहे. इम्तियाज खान (३५) आणि आदित्य ठाकूर (१९), अशी पकडलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. पेल्हार पोलिसांनी दोन गुन्हे दाखल करून दोन्ही आरोपींना अटक केले आहे.

Hello Vasai
Page No. 2 Feb 18, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner